# पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर,
## माहिती अधिकार शाखा

दुरध्वनी क्र.०२४१/२४१६१०३ फॅक्स नं.०२४१/२४१६१३३


जा.क्र RTI कक्ष/अपील/२०१७-२६८९, अहमदनगर, दि. १० /०३/२०१७

विषय :- **माहिती अधिकार कायदा-२००५**
माहिती/अपील/सुनावणी अंमलबजावणीबाबत.

वरील विषयानुसार कळविण्यात येते की, माहिती अधिकार कायदा सन २००५ नुसार प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये, उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालयामध्ये व पोलीस अधीक्षक कार्यालयातील विविध शाखेकडेस, नागरीकांकडुन सदर कायदयान्वये माहिती मिळण्यासाठी अर्ज प्राप्त होतात. परंतु अर्जदारांशी संपर्क प्रस्तापीत करतांना अथवा माहिती पुरवितांना काही प्रकरणांमध्ये तात्काळ माहिती पुरविल्या जात नाहीत. व काही ठिकाणी उध्दटपणाचे वर्तन पोलीसांकडुन होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

१. सदर माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यावर माहिती उपलब्ध असल्यास व देण्यायोग्य असल्यास, त्या बाबत अर्जदारांशी तातडीने संपर्क करुन माहिती देण्यात यावी. यासाठी प्रभारी अधिकारी यांनी स्वतः वैयक्तीक लक्ष पुरवावे.

२. ज्या प्रकरणी माहिती देणे शक्य नाही. अशा प्रकरणात नम्रतेने व सौजन्यतेने माहिती न देण्याची कारणे समजावुन सांगावीत. व त्या बाबत अर्जदारास तोंडी, फोनद्वारे, व इतर माध्यमाद्वारे कळविण्याऐवजी लेखी पत्राने कळवुन समक्ष त्यांची स्वाक्षरी घ्यावी.

३. ब-याच प्रकरणात अर्जदारास फोन केला, निरोप दिला, परंतु तो माहिती घेण्यासाठी आला नाही ई. सबबी यापुढे टाळाव्यात. अर्जदारांशी वैयक्तीक व समक्ष संपर्क प्रस्तापीत करुन त्यास लेखी पत्राने (रजिष्टर पोस्टाने) किंवा समक्ष बोलावुन होणा-या पत्रव्यवहाराची प्रत दिल्या/मिळाल्या बद्यल स्वाक्षरी घेऊन कागदोपत्री पुरावा नस्तीवर ठेवावा.

४. माहिती पुरवितांना विलंब, दप्तर दिरंगाई होणार नाही. याकडेस जन माहिती अधिका-यांनी स्वतः वैयक्तिकलक्ष ठेवावे/पुरवावे.

५. केवळ पोस्टाने माहिती पाठविली त्याबद्यल कोणताही पुरावा जन माहिती अधिका-याकडेस नसतो, माहिती पोस्टाने पाठविण्याऐवजी रजिष्टर पोस्टाने पाठविण्याची पध्दत यापुढे अवलंबविण्यात यावी.

६. बहुतांशी प्रकरणात माहिती मागविणारा अर्जदार सवयीचा असतो. केवळ प्रशासनास वेठीस धरुन त्रास व्हावा या उद्येशाने माहिती मागवित असल्यास अशा अर्जदारांचे अभिलेख योग्यरित्या तयार करुन अभिलेखावर ठेवावेत. व आवश्यक वेळी त्याचा उपयोग करावा.

७. राज्य माहिती आयुक्त, खंडपिठ, नाशिक येथे अर्जदारांनी अपील केल्यास अशा वेळी प्रभारी अधिकारी यांनी कामकाजाची विस्तृत माहितीसह हजर राहावे. त्यांना स्वतः हजर राहणे शक्य नसल्यास त्यांनी अनुभवी व जबाबदार तसेच प्रकरणाची माहिती असलेल्या अधिका-यास योग्य त्या कागदपत्रांसह व नस्तीसह खंडपीठ, नाशिक येथे हजर. राहण्यासाठी सुचना द्याव्यात. कोणत्याही परिस्थितीमध्ये कर्मचारी अथवा परिविक्षाधीन पोलीस उप अधीक्षक, पोलीस उप निरीक्षक यांना खंडपिठापुढे माहिती देण्यासाठी पाठवू नये/हजर ठेवु नये.

८.  मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग खंडपीठ, नाशिक येथे सध्या श्री. के.एल. बिश्नोई, माजी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नियुक्ती झालेली असल्याने सदर खंडपिठासमोर अपील कामानिमित्त उपस्थीत होणा-या सर्व अधिका-यांनी गणवेषात उपस्थीत रहावे व ज्या अपील प्रकरणाची अथवा नस्तीची अपील सुनावणी असते त्या बाबतची सर्व माहिती अभ्यास करुन योग्य तेथे निशान्या (फ्लॅग) लावून योग्य पध्दतीने सादर करावी. अभ्यास करुनच खंडपीठासमोर उपस्थित राहात जावे.

९.  माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये सर्व पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी आणि उप विभागीय पोलीस अधिकारी यांनी पोलीस ठाण्याच्या/कार्यालयाच्या दर्शनी भागात नोडल अधिकारी, जनमाहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी यांचे नांव व पदनामाचा बोर्ड लावण्याची दक्षता घ्यावी.

वरील सुचनांची सर्व जन माहिती अधिका-यांनी नोंद घ्यावी व उचित कार्यवाही करावी.

( घनश्याम पाटील ) 10.3.17

अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर,तथा
प्रथम अपीलीय अधिकारी,
अहमदनगर जिल्हा

प्रति,

१.  अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपुर

२.  उप विभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग शहर/ग्रामिण/कर्जत/शेवगांव/श्रीरामपुर/शिर्डी/संगमनेर

३.  पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय, अहमदनगर

४.  पोलीस निरीक्षक/सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे कोतवाली/तोफखाना/कॅम्प/एमआयडीसी/नगर तालुका/पारनेर/सुपा/कर्जत/श्रीगोंदा/बेलवंडी/जामखेड/शेवगांव/पाथर्डी/नेवासा/सोनई/शनि-शिंगनापुर/श्रीरामपुर शहर/श्रीरामपुर तालुका/राहुरी/कोपरगांव शहर/कोपरगांव तालुका/शिर्डी/राहाता/लोणी/संगमनेर शहर/संगमनेर तालुका/ घारगांव/ अकोले राजुर/आश्वी, जिल्हा अहमदनगर

५.  पोलीस निरीक्षक/सहाय्यक पोलीस निरीक्षक, जिविशा/ शवाशा/शिर्डी शवाशा/जि.वाहतुक शाखा/ मंदीर सुरक्षा/स्थागुशा/बिनतारी संदेश/बीडीडीएस, अहमदनगर/बीडीडीएस शिर्डी/ मो.प.वि/ पोमु/ आर्थीक गुन्हे शाखा/सायबर/मोबाईल सेल/दहशतवाद विरोधी सेल/पोलीस वेल्फेअर/नियंत्रण कक्ष/ पोलीस अधीक्षक यांचे वाचक/अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांचे वाचक/फिंगरप्रिन्ट/

६.  कार्यालय अधीक्षक, प्रमुख लिपीक/लेखा शाखा/पत्रव्यवहार शाखा/अधिकारी आस्थापना शाखा/ कर्मचारी आस्थापना शाखा/पत्रव्यवहार शाखा/विभागीय चौकशी शाखा/अर्ज चौकशी शाखा/

<u>प्रत माहितीस्तव सादर :-</u>

मा. पोलीस अधीक्षक, अहमदनगर